ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 10 | JUNE - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# नागपूरकर भोसल्यांच्या राज्यातील टपाल व्यवस्था



कु प्राची रामचंद्र पोगुलवार
संशोधक विद्यार्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
सहा. शिक्षिका, जामदार हायस्कूल व कनिष्ठ महा. नागपूर.

## प्रस्तावना:—

नागपूर राज्यात ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली टपाल व्यवस्था निर्माण होण्यापूर्वी मराठ्यांच्या राज्यात टपाल ने—आण करण्यासाठी कोणती व्यवस्था होती याबद्दल डॉ. एस. एन. सेन म्हणतात, मराठा राज्यात नियमित असा डाक विभाग नव्हता लष्करी कामकाजाची वार्ता, खलिते पाठविणे हे काम करण्याची जबाबदारी जासूद आणि हरकारे यांच्यावर होती. जासूद हे माहिती पोहोचविण्याच्या एका आवश्यक अशा कार्य स्थानाचे प्रतिनिधित्व करित असे. नागपूर ते पुणे दरम्यान दळणवळण आणि डाक पाठविण्याची व्यवस्था मुधोजी भोसले यांच्या कारकिर्दीत झाली होती. सरकारी डाकेबरोबरच खाजगी लोकांचेही पत्रे जात असत. सरकरी डाकेपेक्षा सावकारी डाक लवकर पोहोचत असे.[१]

मराठी राज्यात हल्लीसारख्या आगगाडया आणि तारयंत्र नव्हती. टपालव्यवस्था सुधारलेली नव्हती हल्ली सारखी टपाल साधने सुधारलेली नव्हती. डाक ही क्वचीत प्रसंगी उंटावरून किंवा स्वाराबरोबर पाठविण्यात येत असे. टपाल वाहून नेणा—यास जासूद, हरकरा किंवा काशिद म्हणत असे. लहान अंतर असल्यास एकटाच टपालवाला पाठविल्या जात असे. परंतू मोठया वाटेवर किंवा कागदपत्र महत्वाचे असल्यास काशिद जोडी पाठविण्यात येई. त्याचे कारण की वाटेत आजारी, अपघात किंवा दगाफटका होवून एक निरोपयोगी झाल्यास दुसरा ते काम करू शकेल. प्रत्येक सरकारी कचेरीतून किंवा सरकारी पेढीवर आवकजावक, टपालपूस्तक असे. बरेचदा सरकारी कचेरीतून व व्यापारी पेढीवरून रोजच्या रोज गावोगाव पत्रे रवाना करण्याचे कार्य सुरू असे. सामान्य लोकांना स्वत:चे जासूद पाठविणे परवडत नसत परंतू ज्या —ज्या ठिकाणच्या सरकारी कचेरीच्या टपालाबरोबर खाजगी लोकांची पत्रे पाठविण्याची थोडीफार सोय असे. त्याकरीता ठराविक आकार घेण्यात येईल.

टपालवाल्याला सरकारी खर्चाने पायताण आणि काठी देण्यात येईल. या काठीला घुंगरू लावलेले असत ज्यामूळे त्याच्या आवाजाने टपालवाल्याच्या चालीला गोड सुरांची साथ मिळे.[२]

दुसऱ्या रघुजीच्या दरबारात अंताजी नाईक नावाचा जासूद होता. हा १५ हरकारेचा प्रतिनिधी म्हणून कटक येथे कार्यरत होता. जासूदाचे कार्य फक्त सरकारी आणि उच्चवर्गीय व्यक्तीचे काम करणे होते. ते सर्वसामांन्यांची डाक पोहोचवित नसत. डाक पाठविण्याकरिता प्रत्येक तीस मैलावर ३ घोडे, ३ हत्ती आणि अनेक वार्ताहर (हरकरे) होते. नागपूर ते पुणे, पुणे ते नागपूर येथे डाक पोहोचविण्याकरिता ६० जोड्या वार्ताहर ठेवले होते. सोबत उंटस्वार असत. महत्त्वाची आणि 'त्वरित' पत्रे उंटस्वाराबरोबर पाठविली जात. त्यावेळी महत्त्वाच्या नगरामधील अंतराचे उल्लेख वारंवार येतांना दिसून येते. नागपूर ते सीताबर्डीचे देऊळ १. कोस तेलंगखेडी २. कोस, रामटेक १२ कोस, गीरडचा पीर २० कोस आणि पुणे २०० कोस. कलकत्त्याहून नागपूरला पोहचण्याकरिता प्रवासाला दीड महिना आणि नागपूरहून पुण्याला पोहोचण्याकरिता फक्त १५ दिवस लागत असत. पावसाळयात नदी ओलांडणे कठिण होते.[३]

पोस्टमास्तर विल्यियम आयझेक जानेवारी १८०४ मध्ये निर्माण झालेल्या पोस्ट—ऑफिसबद्दल सांगतो की, पोस्ट—ऑफिस निर्मितीच्या प्रारंभापासून टपाल विभाग विविध भागात पसरला आणि नागपूर राज्यातील प्रत्येक जिल्हयातील मुख्यालये गाठण्यात

आली. ३१ मे १८२५ रोजी नागपूरला पोस्ट मास्तर विल्यिम आयझेक याने नागपूरच्या दरबारी वास्तव्यास असलेल्या ब्रिटिश रेसिडेन्टास आपल्या विस्तृत डाक व्यवस्थेचे माहिती दिली.

देवगांवच्या तहानंतर १८०३ मध्ये एलफिन्स्टनची रेसिडेन्ट म्हणून नियुक्ती झाल्यानंतर ऑर्थर वेलस्लीने त्याला नागपूर–कटक व नागपूर–हैद्राबाद आणि अमरावती असा डाकविभाग सुरू करण्याचे सूचविले व त्यासाठी राजाला देवगांवच्या तहाचे ९ व्या कलमानुसार आग्रह करण्यास सांगितले. हैद्राबादहून अमरावतीला किंवा नागपूरच्या जवळ दुसऱ्या गावी डाक सुरू करण्यास सांगितले. दुसऱ्या रघुजीचा मंत्री श्रीधर पंडित याने तशी परवानगी मिळवून दिली. ओरिसा छत्तीसगडचा रस्ता चांगला नसल्यामुळे कलकत्याची डाक बनारसहून नागपूरला नेण्याची परवानगी दिली; परंतु एलफिन्स्टनला नागपूरला मार्ग कटकहून हवा होता. तशी परवानगीही मिळाली. असे विल्यम आयझेकच्या मते जानेवारी १८०४ मध्ये डाक विभाग नागपूरला सुरू झाला तो नागपूरचा पोस्टमास्टर होता. त्याने रेसिडेन्ट कॅप्टन गॉर्डन याला लिहिलेल्या पत्रात (१८२५) तसा उल्लेख केलेला आहे. तेव्हापासूनच प्रत्येक जिल्हयाच्या ठाण्याशी संपर्क होत होता. इंग्रज लेखक (हेडरायटर) व त्याचा मदतनीस अशा दोघांना सतत काम दिले जाई. सर्व पत्रांची नोंदणी वेळेनुसार केली जात. लेखक मराठी पत्रातील मजकूर समजावून देऊन उत्तर तयार करी. नागपूर या विभागाचे केंद्र होते.एक मार्ग बरोली घाटातून होशंगाबाद पर्यंत जात असे. या मार्गावर ११ थांबे होते.[४]

नागपूर ते रामटेक पर्यंत नागपूर विभागाचा अंमल होता. तोच मार्ग पुढे जबलपूर व बनारसकडे जात असे. नागपूर ते सीताबर्डी खेरी–केरडी–रामटेक असा मार्ग होता. दक्षिणेकडे मार्गात २३ मुक्काम असत व तो हैद्राबाद निर्मल पर्यंत जात होता. पश्चिमेकडील मार्गात अमरावतीपर्यंत १४ मुक्काम होते.

### सदर पोस्टऑफिस निर्मितीचे व्यवस्थापन:–

पोस्ट ऑफिसमध्ये एक इंग्रजी लेखक असे. त्याच्या हाताखाली सहकारी असत. हे सहकारी येणाऱ्या–जाणाऱ्या पत्रांची संपूर्ण माहिती लिहून ठेवीत. कोणत्या वेळेस कोणती डाक आली आणि कोणती डाक पाठविण्यात आली हे कार्यसुद्धा त्यांचे होते. इंग्रजी लेखकाला ही माहिती वरच्या लेखकाला कळवावी लागे. तसेच मुख्य लेखकास विविध टपाल चौकातील मुत्सद्दी आणि दफादारांना आलेल्या पत्राची माहिती ठेवावी लागत असे.

**इतर टपाल मार्ग:–** टपाल व्यवस्थेमध्ये नागपूर हे मध्यवर्ती ठिकाण होते. येथून पूर्व–पश्चिम, उत्तर–दक्षिणचे रस्ते जोडल्या गेले होते. तर एक आणखी टपाल मार्ग होता, तो म्हणजे होशंगाबाद ते घाटबरेली हा होय.

**उत्तरेतील डाकमार्ग:** हा डाकमार्ग नागपूर पोस्ट ऑफिसच्या नियंत्रणात येत होता. रामटेक मार्गे जबलपूर आणि बनारसपर्यत या मार्गाचा विस्तार झालेला होता,

### दक्षिणेकडील डाक मार्ग:

हा मार्ग सीताबर्डी पासून सुरू होत असून तो २२ स्थानावरून जात होता. निर्मल रस्त्यावर होते. तो रस्ता हैद्राबादवरून दूरवर्ती भागापर्यंत जात होता.

**पूर्व डाकमार्ग:** हा मार्ग नागपूर ते कलकत्ता असा होता; परंतु हा मार्ग नागपूर पोस्टमास्तरच्या नियंत्रणात होता. या मार्गात १६ टप्पे होते. ज्यावर नियमित टपाल वाहकांची नियुक्ती केली होती. नागपूर ते होशंगाबाद बरेलीपर्यंत असा आणखी एक मार्ग निघाला होता. त्यामध्ये ११ टप्पे होते अशाप्रकारे नागपूर शहर ते भारतातील पूर्व–पश्चिम, उत्तर–दक्षिण जाणाऱ्या डाक मार्गावरील प्रमुख शहर होते[५].

### डाकमार्गावर काम करणारे सेवक:–

या डाक मार्गावरील काम करणाऱ्या सेवकांची नियुक्ती आणि त्यांचा पगार त्यांच्या महत्त्वावरून निश्चित होत असे. दोन ठिकाणामधील अंतर, जंगली जनावरांपासून रस्त्यावर असणारा धोका व इतर परिस्थितीनुरूप सेवकांची कामे होती. तरी मुख्यत: भाषानुसार खालील पदे भरल्या जात असे.

**१. मुतसूद (लेखक किंवा लिपिक) :** मुतसूद म्हणजे लिहिणारा बाबू. याची नियुक्ती महत्त्वाच्या डाकचौकीत होत असे. येणाऱ्या जाणाऱ्या डाक वाहकांच्या वेळेची नोद करणे, हे त्याच्या कार्यालयाचे मुख्य काम असून डाकवाहक व दफादारांच्या कार्याची माहिती त्याला ठेवावी लागत असे. या मुत्सद्याला महिन्याला ३५ रु. वेतन मिळत असे.

**२. सरबराया :**डाक वाहक व दफादारांचे पगार वाटप करणे, हे त्याचे कार्य होते. त्यासाठी त्याला कार्यालयातून निश्चित वेतन मिळत. प्रत्येक मार्गावर त्याचे कार्यालये असून ही कार्यालये पूर्णवेळ कामात व्यस्त असायची. याला २ ते ४०० मैल प्रवास दर महिन्याला करून वेगवगेळया डाक मार्गाची रक्कम नेऊन द्यावी लागत. जास्त अंतर प्रवास करावा लागल्यामुळे व जवळ मोठी रक्कम बाळगावी लागल्यामुळे सोबत सुरक्षेसाठी एक सुरक्षा गार्ड असायचा. याचा संबंध मुख्यत: व्यवस्थापकाशी येत.

**३. दफादार (निरीक्षक) :** हा अधिकारी विविध डाक विभागाचे पर्यवेक्षण करीत असे. एका डाकचौकीतून दुसऱ्या डाक चौकीत सतत **जाणे व** डाक वाहकाच्या कार्यावर लक्ष ठेवणे हे कार्य दफादाराचे असे. त्याला १० रु. ते ८ रुपयाच्या दरम्यान वेतन मिळत असे.

**४. हरकरे आणि वाहक :** डाक मार्गावरील परिस्थिती लक्षात घेऊन डाक वाहकांची संख्या निश्चित **होत असे.** परंतु प्रत्येक पातळीवर कमीतकमी २ ते ३ वाहक नियुक्त केले जात. तसेच प्रत्येक डाक चौकीवर ४ ते ५ वाहक नियुक्त केल्या जात असे. त्यांना ५ ते ६ रुपयाच्या दरम्यान मासिक वेतन मिळत. त्याच्या मदतीला काही चपराशी ही नियुक्त केल्या जात. या कार्यासाठी इ.स. १८३७ मध्ये सार्वजनिक उपयोगासाठी डाक विभाग मुक्त झाला.[४] घोड्यावरील डाकेचा **उल्लेख** ३१ डिसेंबर १७३८ च्या पत्रात मिळतो. नाव किंवा डोंग्याचा उपयोग टपाल पाठविण्यासाठी केल्या जात असे. जिल्हयामध्ये उपडाक प्रमुख असत. त्याला कार्यकारी निरिक्षक असे म्हणत. नागपूरकडे जाणाऱ्या डाकेसाठी लागणाऱ्या पोस्टेजची माहिती त्यास मिळत नाही. अंतरावर व वजनावर ते अवलंबून असे. इ.स. १८५४ पर्यंत टपाल खर्च हा जास्त होता. नंतर डलहौसीने ते स्वस्त केले मुंबई येथे खास नागपूरच्या कामासाठी पोस्टमास्टर जनरल नियुक्त केला[५].

## जिल्हयातील टपाल व्यवस्था :

जिल्हयातील टपाल व्यवस्था अधीक्षक पाहत. हा अधीक्षक उप–पोस्ट मास्तर म्हणून काम करीत असे. छत्तीसगड येथे स्थापन झालेल्या डाक व्यवस्थेचे कामकाज रायपूरहून चालत असे. त्यातील कर्मचारी व पगार पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| १. | १ उप–पोस्ट मास्तर (कॅप्टन सन्डी) | १०० रु. प्रति महिना |
| २. | १ इंग्रजी लेखक | २० रु. प्रति महिना |
| ३. | १ बेलजघर येथील लिपिक | १० रु. प्रति महिना |
| ४. | १ दुर्ग येथील लिपिक | ०६ रु. प्रति महिना |
| ५. | १ पत्र वाटप करणारा हरकरा | ०४ रु. प्रमि महिना |
| ६. | इतर सेवक | ०५ रु. प्रति महिना |

अशाप्रकारे डाक व्यवस्था कंपनीद्वारे चालविल्या जात होती. या व्यवस्थेमुळे रघुजी तिसऱ्याच्या काळात नागपूर राज्यातील ब्रिटिश अधिकाऱ्यांना कामकाज पाहण्यासाठी एकप्रकारची सोय निर्माण झाली होती.

## राजाची डाक व्यवस्था:

राजाने रायपूर येथे डाक व्यवस्था सुरू केली. ही डाक व्यवस्था उप–पोस्टमास्तर याच्या नियंत्रणात होती. ही व्यवस्था काही काळापूर्वीच सुरू झाली होती असे दिसून येते, ही व्यवस्था रायपूरवरून चालविल्या जात आणि रतनपूरपर्यंत डाक वाहून नेल्या जात असे. जो की राजाच्या डाक व्यवस्थेतील एका मार्गावरील सर्वात दूरचा टप्पा होता. या डाकमार्गाद्वारे ९४ मैल अंतर पार केल्या जात. यामध्ये १२ टप्पे होते.

या मार्गावर खालीलप्रमाणे नियुक्त्या केल्या होत्या:

| | |
|---|---|
| १ लिपिक | १० रु. प्रति मासिक वेतन |
| २ दफादार | ४ रु. प्रति मासिक वेतन |
| ३ सरबराही | ६ रु. |
| २४ हरकरे | ९६ रु. प्रति मासिक वेतन |

लेखक सुद्धा नियुक्त केल्या जात. त्याचे वेतन उप–पोस्टमास्तराद्धारे दिल्या जाई. देशातील ज्या भागातून हे डाकमार्ग जात होते, तो मार्ग जंगली होता त्यामुळे हरकरे व डाक वाहकांना अतिशय संघर्ष करावा लागत. जंगली प्राण्यांपासून ज्यांना हानी झाल्यास त्या हरकरे आणि डाक वाहकाला निवृत्ती वेतन मिळण्याची व्यवस्था केली होती.[७]

## टपाल खर्च:

टपालखर्च हा अंतराने आणि वजनाने ठरविल्या जात असे. ब्रिटीशाने भारतामध्ये दुरच्या क्षेत्रांना जोडण्याकरिता टपाल जाळे वाढविले. त्यामुळे त्यांना आपल्या राजकीय आणि प्रशासकीय दृष्टीने फायदयाचे होते. टपालखर्च प्रदेशातील अंतरानुसार वेगवेगळा होता. पोस्टाचे तिकीट लावण्याची व्यवस्था निर्माण झालेली नव्हती असे दिसून येते. टपाल खर्चाची रक्कम रोख आणि अगोदरच वसूल केल्या जात.एका टोकावर लागलेला टपालखर्च हा दुसऱ्या टोकावर सुद्धा वसूल केल्या जात.

## डाक वाहून नेण्याची पद्धत:–

पूर्वी फक्त एका मार्गावर घोडयांद्वारे डाक वाहून नेल्या जात असे व तो मार्ग म्हणजे कलकत्ता–बॉम्बे होय. घोडयांद्वारे डाक वाहून नेण्यासाठी नागपूर ते पुणे हया मार्गाला पहिले श्रेय जाते. फोर्ब हा बॉम्बेमधील कार्यकारी पोस्टमास्तर जनरल होता. डाक मार्ग हे सामान्यत: डाक वाहकावर अवलंबून असे.

जे एका ठिकाण्यावरून दुसऱ्या ठिकाणावर पायीच डाक वाहून नेत असे. हे डाक वाहक टपाल व्यवस्थेमध्ये नियुक्त केले जात, परंतु टपाल खात्याने डाक वाहून नेण्याकरिता ठेकेदार नियुक्त केले होते डाक पोहचविण्यासाठी पुण्यातील एक पारसी ज्याचे नाव पेस्तनजी सोराबजी यांच्याकडे ठेका देण्यात आला होता. डाक वाहून नेण्यासाठी नियुक्त ठेकेदार सामान्य डाकपेक्षा अतिरिक्त डाक पोहचविण्यासाठी जादा पैशाची मागणी करीत होते. मात्र सामान्य डाकसाठी ते प्रत्येक महिन्याला आपले बिल सादर करीत.

नदीनाल्यांनी विभक्त झालेल्या डाक मार्गावर एका प्रांतातून इतर प्रांतामध्ये डाक वाहून नेण्याकरिता देशी डोंग्याचा वापर केला जाई. स्टिव्हन्स (नागपूर प्रांताचा डाकमार्ग अधीक्षक) नागपूर येथील दरबारात वास्तव्यास असलेला सहकारी ब्रिटिश रेसिडेन्ट कॅप्टन रॅमसेला पत्रात विनंती करतो की, रायपूर, भंडारा, चंद्रपूर, जिल्हयात नेमलेल्या ठेकेदारांना डाक वाहून नेण्याकरिता डोंग्यासाठी विनामुल्य लाकूड प्राप्त करण्यास परवाना देण्यात यावा.[७]

## निष्कर्ष:

नागपूर प्रांतातील भोसल्यांच्या काळातील टपाल व्यवस्थेचा अभ्यास केला असता असे दिसून येते की टपाल व्यवस्थेची प्रगती हळुवार होती. सुरुवातीला टपाल व्यवस्था सर्वसामान्य जनतेच्या उपयोगासाठी नव्हती. कार्यालयीन पत्रे आणि पार्सलची ने–आण करण्यासाठी ही व्यवस्था अस्तित्वात होती. . रोख रकमेच्या बदल्यात ही व्यवस्था व्यक्तिगत उपयोगासाठी उपलब्ध होत असे.

## संदर्भ:–

१. अंधारे भा.रा., नागपूरचे भोसले, हिंदी–मराठी प्रकाशन, नागपूर, २०१८, पान नं. ४४७,
२. केळकर, न.चि. मराठे व इंग्रज, जगादितेच्छु प्रेस, ५०७ शनवार पेठ, पूणे, १९२२, पेज नं.२४५,
३. अंधारे, भा.रा. भोसलेकालीन नागपूर, पान. न. ८९
४. अंधारे, भा.रा. दुसरे रघुजी भोसले, पान नं १०३
५. अंधारे भा.रा., अखेरचा सेनासाहेब सुभा, पान नं ९८–९९
६. कित्ता पान नं १००
७. R. M. Sinha, Bhoslas of Nagpur the Last Phase, page no. 200
८. कित्ता पेज नं २०९